जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 4 AUG 2017
पुण्यनगरी



कोल्हापूर : बॅ. बाबासाहेब खर्डेकर यांच्या जयंतीनिमित्त भरविण्यात आलेल्या चित्र आणि ग्रंथ प्रदर्शनात ग्रंथांची माहिती घेताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत डॉ. नमिता खोत आदी. (छाया : एस. अली)

# बॅ. बाळासाहेब खर्डेकरांच्या जयंतीनिमित्त पुस्तक प्रर्दशन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

बॅ. बाळासाहेब खर्डेकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून शिवाजी विद्यापीठातील ग्रंथालयामध्ये आयोजित चित्र व संदर्भग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रदर्शनात पुराभिलेखा विभागातील संदर्भग्रंथ व डॉ. गोरख कांबळे यांच्या लेक वाचवा संवाद चित्रांचा समावेश आहे.

विद्यापीठातील 'लेक वाचवा संवाद' चित्र प्रदर्शनात मुख्यतः लेक वाचवा, शेतकऱ्यांच्या व्यथा, कौशल्य विकास, स्वच्छता मोहीम, महिला सबलीकरणाला पुरुषप्रधान संस्कृती कशी अडथळा करते, आदी विषयांवरील १०० चित्रांचा समावेश आहे. अवघड विषय सोपे करून सांगण्यासाठी डॉ. कांबळे यांनी चित्रकलेचा उपयोग केला आहे. तसेच स्त्रीभ्रूण हत्येसंदर्भात समाजात जनजागृती केली आहे.

उद्घाटनप्रसंगी प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, ग्रंथपाल नमिता खोता, डॉ. पी. डी. राऊत, उपकुलसचिव व्ही. एस. सोयाम आदी उपस्थित होते.

- 4 AUG 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘चंपारण्य’ ही गांधीजींची प्रयोगशाळा

## जयंत दिवाण : गांधी अभ्यास क्रेंदातर्फे व्याख्यान

सकाळ वृत्तसेवा



जयंत दिवाण

कोल्हापूर, ता. ३ : चंपारण्य सत्याग्रह ही महात्मा गांधीजींची सामाजिक आंदोलनाची प्रयोगशाळा ठरली, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत जयंत दिवाण यांनी केले. शिवाजी विद्यापीठाचे गांधी अभ्यास केंद्र व राज्यशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित डॉ. उषा मेहता स्मृती व्याख्यानांतर्गत ते ‘चंपारण्य लढ्याची शतकपूर्ती’ विषयावर बोलत होते. डॉ. अशोक चौसाळकर अध्यक्षस्थानी होते.

श्री. दिवाण म्हणाले, ‘‘डॉ. उषा मेहता यांच्या माध्यमातून महात्मा गांधीजी कळाले. चंपारण्य सत्याग्रहाला शंभर वर्ष पूर्ण होत आहेत. चंपारण्य हे वसाहतवादाचे छोटेसे उदाहरण होते. येथे शेतकरी निळीची शेती करून त्याच्या पानापासून रस निर्माण करत होते. याठिकाणी ७२ कोठीवाले म्हणजे ब्रिटिश लोकांची मक्तेदारी होती. निळ पेरण्यासाठी शेतकऱ्यांवर अन्याय, अत्याचार व जुलूम केले जात. या शोषणाविरुद्ध गांधीजींनी लढा सुरू केला.’’

ते म्हणाले, ‘‘कोठीवाले स्वत:ला सर्वेसर्वा समजत. शेतकऱ्यांवर मनमानी कर लावत. जनतेचे करामुळे वैयक्तिक, मानसिक, शारीरिक व आर्थिक शोषण होत होते. सातत्याने



स्थानिक वर्तमानपत्रांमध्ये लिखाण होऊनही त्यावर मार्ग निघत नव्हते. या परिस्थितीत गांधीजी त्या ठिकाणी गेले. त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण लढ्यामुळे हे आंदोलन सामाजिक आंदोलन ठरले.

या प्रश्नाबाबत भयमुक्त वातावरण निर्माण करण्यासाठी चंपारण्याचा सत्याग्रह केला होता. त्या ठिकाणचे प्रमुख शहर मोतीहारी येथे गांधीजींनी सविनय कायदेभंग केला. चंपारण्याच्या लढ्यामध्ये गांधीजींनी रचनात्मक कामेही जोडली.’’

डॉ. चौसाळकर म्हणाले, ‘‘भारतात बिहार व बंगाल येथे निळीचे उत्पादन घेण्यात येत होते. यामुळे ब्रिटिशांची आर्थिक पकड येथील साम्राज्यावर घट्ट होत गेली. ती गांधीजींच्या चंपारण्य येथील तीव्र लढ्यापुढे निष्फळ ठरली.’’

अधिष्ठाता डॉ. भारती पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. प्रकाश पवार यांनी आभार मानले. या प्रसंगी डॉ. भगवानराव माने, डॉ. अवनिश पाटील उपस्थित होते.

# पॅरासिटॅमॉलचा अतिवापर हानिकारक : डॉ. आपटे

कोल्हापूर, ता. ३ : थंडी तापावर वापरल्या जाणाऱ्या पॅरासिटॅमॉल या औषधाच्या अतिवापरामुळे यकृत निकामी होते. त्यामुळे त्याचा अतिवापर टाळावा, असे आवाहन अमेरिकेतील डॉ. उदयन आपटे यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील प्राणीशास्त्र अधिविभागामध्ये ‘ओव्हर डोस ऑफ पॅरासिटॅमॉल कॉझ्नेस लिव्हर इंजुरी’ या विषयावर झालेल्या व्याख्यानामध्ये ते बोलत होते.

डॉ. आपटे हे अमेरिकेतील कनसास विद्यापीठामधील फार्माकॉलॉजी टॉक्सीकॉलॉजी विभागामध्ये कार्यरत आहेत. ते म्हणाले, ‘‘मोठ्या माणसांना प्रतिदिन जास्तीत जास्त चार ग्रॅम पॅरासिटॅमॉल घेतले असता चालू शकते, परंतु त्यापेक्षा जास्त डोस हा यकृताला घातक ठरू शकतो.’’

विभागप्रमुख डॉ. पी. डी. राऊत यांनी संयोजन केले. सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन डॉ. माधुरी वाळवेकर यांनी केले. या कार्यक्रमासाठी प्रा. डॉ. डी. व्ही. मुळे, प्रा. ग. प. भवाने, डॉ. शांताकुमार मन्ने, डॉ. एस. आर. यंकची, डॉ. एस. एम. गायकवाड, डॉ. ए. डी. जाधव, डॉ. ए. ए. देशमुख, डॉ. एन. के. कांबळे, डॉ. एम. पी. भिलावे, डॉ. एम. जी. जोशी आदी उपस्थित होते.

4 AUG 2017
पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# चंपारण्य सत्याग्रह सामाजिक आंदोलनाची प्रयोगशाळा

## – जयंत दिवाण

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
चंपारण्य हे वसाहतवादाचे छोटेसे उदाहरण होते. मात्र, हाच चंपारण्य सत्याग्रह ही महात्मा गांधीजींची सामाजिक आंदोलनाची प्रयोगशाळा ठरली, असे प्रतिपादन मुंबई येथील ज्येष्ठ विचारवंत जयंत दिवाण यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचे गांधी अभ्यास केंद्र आणि राज्यशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहामध्ये डॉ. उषा मेहता स्मृती व्याख्यानांतर्गत 'चंपारण्य लढ्याची शतकपूर्ती' या विषयावर ज्येष्ठ विचारवंत जयंत दिवाण, मुंबई यांचे व्याख्यान आयोजित करण्यात



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ येथे व्याख्यानांतर्गत 'चंपारण्य लढ्याची शतकपूर्ती' या विषयावर बोलताना जयंत दिवाण. सोबत मान्यवर**

आले होते. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी अध्यक्षस्थानी डॉ.अशोक चौसाळकर होते.

जयंत दिवाण म्हणाले, डॉ. उषा मेहता यांच्या माध्यमातून महात्मा गांधीजी कळाले. चंपारण्य सत्याग्रहाला शंभर वर्ष पूर्ण होत आहेत. कच्च्या मालापासून पक्का माल तयार करून त्याच्यामधून फायदा करून घेतला जात होता. त्याठिकाणी ७२ कोठीवाले म्हणजे ब्रिटिश लोकांची मक्तेदारी मोठ्या प्रमाणात होती. शेतकऱ्यांवरील अन्यायाविरुद्ध लढा देण्यासाठी गांधीजींनी प्रयत्न सुरू केले. त्यावेळची जनता करापोटी मोठ्या प्रमाणात भरडली जात होती. अशा परिस्थितीत महात्मा गांधीजींच्या चंपारण्य येथील वैशिष्ट्यपूर्ण लढ्यांमुळे हे आंदोलन एक सामाजिक आंदोलन ठरले. नवीन समाज घडविण्यासाठी गांधीजीं या माध्यमातून सातत्याने प्रयत्न करत गेले. अशाप्रकारे भारतीय स्वातंत्र्याची ती एक प्रयोगशाळाच ठरली.

प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांचा परिचय सामाजिक विज्ञान आणि कला विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ.भारती पाटील यांनी केले. आभार डॉ.प्रकाश पवार यांनी मानले. यावेळी डॉ. भगवानराव माने, अवनिश पाटील आदी उपस्थित होते.

4 AUG 2017
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# चंपारण्य सत्याग्रह ही सामाजिक आंदोलनाची प्रयोगशाळा ठरली

## जयंत दिवाण : 'चंपारण्य लढ्याची शतकपूर्ती' विषयावर व्याख्यान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

चंपारण्य सत्याग्रह ही महात्मा गांधीजींची सामाजिक आंदोलनाची प्रयोगशाळा ठरली, असे प्रतिपादन मुंबई येथील ज्येष्ठ विचारवंत जयंत दिवाण यांनी केले. शिवाजी विद्यापीठाचे गांधी अभ्यास केंद्र आणि राज्यशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहामध्ये डॉ. उषा मेहता स्मृती व्याख्यानांतर्गत 'चंपारण्य लढ्याची शतकपूर्ती' या विषयावर ज्येष्ठ विचारवंत दिवाण यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते, त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. अशोक चौसाळकर उपस्थित होते.

दिवाण म्हणाले, डॉ. उषा मेहता यांच्या माध्यमातून महात्मा गांधीजी कळाले. चंपारण्य सत्याग्रहाला शंभर वर्षे पूर्ण होत आहेत. चंपारण्यामध्ये लोकांवर अन्याय होत होता. निळ पेरण्यासाठी शेतकऱ्यांवर अन्याय, अत्याचार आणि जुलूम केले जात होते. या शोषणाविरुद्ध लढा देण्यासाठी गांधीजींनी प्रयत्न सुरू केले. महात्मा गांधीजी त्या ठिकाणी गेले आणि त्यांच्या चंपारण्य येथील वैशिष्ट्यपूर्ण लढ्यामुळे हे आंदोलन एक सामाजिक आंदोलन ठरले. नवीन समाज घडविण्यासाठी गांधीजींनी या माध्यमातून सातत्याने प्रयत्न करीत गेले. अशाप्रकारे भारतीय स्वातंत्र्याची ती एक प्रयोगशाळाच ठरली. निळीच्या प्रश्नाबाबत भयमुक्त वातावरण निर्माण करण्यासाठी चंपारण्याचा सत्याग्रह करण्यात आला होता. त्या ठिकाणचे प्रमुख शहर मोतीहारी येथे महात्मा गांधीजींनी सविनय कायदेभंग केला. चंपारण्याच्या लढ्यामध्ये गांधीजींनी रचनात्मक कामेही जोडली. गांधीजींच्या कार्यकर्त्यांच्या माध्यमातून गावचे रस्ते साफसफाई करणे, विहिरींजवळची चिखल काढणे, आश्रम शाळेमध्ये मुलांना एकत्र करणे यामुळे अत्याचारग्रस्त लोकांना खूप मोठा आधार मिळत गेला व पुढे चंपारण्याचा लढा यशस्वी झाला.

प्रास्ताविक डॉ. भारती पाटील यांनी केले. कार्यक्रमाचे संयोजक डॉ. प्रकाश पवार यांनी आभार मानले.

यावेळी डॉ. भगवानराव माने, अवनिश पाटील व विद्यापीठातील विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
4 AUG 2017

Times of India

# Interviews for MPhil, PhD start at SUK

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Interviews for MPhil and PhD seat allotment have begun at the Shivaji University, Kolhapur (SUK).

The process started on Thursday and will be on for a week.

On July 19, the varsity had announced the result for MPhil and PhD entrance test and had asked candidates to submit any discrepancies by July 23. "About 3,856 candidates appeared for the MPhil and PhD exam on June 21 to 23 from Kolhapur, Sangli and Satara districts," a college official said.

In a circular, the varsity said that the results of the selected candidates and the schedule for MPhil and PhD has been displayed on the website — www.unishivaji.ac.in, under the link MPhil/PhD Admission 2017. "Candidates should visit the website frequently to receive all the updates in time," the official added.

The circular further stated that as per the provisions, the qualifying marks for the test are 50% and the seat allotment will depend on a candidate's overall achievement.

Another SUK official said that there are over 500 seats offered for PhD for 47 subjects while in MPhil, there are over 100 seats offered for 22 subjects.

The admission procedure is being undertaken as per the University Grants Commission (Minimum Standards and Procedure for Award of MPhil/PhD Degrees) Regulations 2016. Earlier, director of board of examinations and evaluation of SUK for MPhil and PhD admissions, Mahesh Kakade had said that the whole process would be completed by July-end and the students would be allotted seats by mid-August.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
4 AUG 2017
पुढारी

# हिवाळी सत्र परीक्षेसाठी ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्यास प्रारंभ

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्र परीक्षेचे प्रवेश अर्ज भरण्यास प्रारंभ झाला आहे. विविध महाविद्यालयांमध्ये विद्यार्थी प्रवेश अर्ज भरण्याबाबत माहिती घेत असल्याचे दिसून आले. प्रवेश अर्ज ऑनलाईन भरला जाणार असल्याने याबाबत प्रत्येक महाविद्यालयाने स्वतंत्र मार्गदर्शन कक्ष सुरू केला असल्याचे दिसून येते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
E 4 AUG 2017

लोकमत

## क्रांतिसिंह नाना पाटील यांना अभिवादन

कोल्हापूर : क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागामध्ये प्रभारी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. नंदा पारेकर, डॉ. अवनिश पाटील, डॉ. नीलांबरी जगताप, आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 4 AUG 2017

Times of India

# Varsity winter examination to start from Oct 4

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) on Wednesday announced the dates for the October semester examinations for its various under-graduate and post-graduate courses.

According a circular, dated August 1, from Mahesh Kakade, director of board of examination and evaluation, SUK, will commence from October 4 across the Sangli, Satara and Kolhapur districts.

A SUK official said that the varsity is planning to bring in more conventional courses (BSc, BCom and BA), under the purview of Secured Remote Paper Delivery (SRPD) system, under which the question papers are directly sent to the respective exam centres through online in an encrypted format.

Currently the SRPD is being used for few undergraduate (UG), engineering and pharmacy courses along with management courses in colleges in Sangli, Satara and Kolhapur districts, said the official.

The university, according to the official, is aiming to keep the examination duration under 50 days, as it did in the last few semester exams.

The official added that the examination duration, which was of 79 days two years ago, has been systematically brought down to 56 days and now to 42 days.

"The examination department has good result announcement ratio and it is always made sure that results do not get delayed unless there are genuine emergencies," said the official.

## Exam scene

- No. of exams: 600
- No. of answer sheets assessed: 12 lakh
- No. of affiliated colleges: 281
- No. of students: 2.5 lakh

**Important dates**

- Submit exam form with regular fee: August 22
- Submit exam form with late fee: From August 23 to 29
- Submit exam fee with super late fee by September 6

Notably, the exam department has set a deadline of August 22 for submission of examination forms with regular fees, while the last date to submit forms with super late fees has been set on September 6. The date for colleges to submit the list of students for the exam has been set on September 8, stated the university circular.

According to the university circular, a detailed schedule for each course will be released soon. However the date of commencement of exam for around 500 examinations has been announced in the circular, which students can check on the university website.

It may be noted that Shivaji University conducts around 600 examinations per semester among which around 4,000 paper setters are engaged with the outcome of setting 6,000 question papers.

Overall, more than 12 lakh answer sheets are assessed every year at the division.

-4 AUG 2017 तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कबड्डीतील 'दादा'चा सन्मान!

## शिवाजी विद्यापीठ बोर्ड ऑफ स्पोर्टस्च्या सदस्यपदी प्रा. संभाजी पाटील यांची नियुक्ती

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या बोर्ड ऑफ स्पोर्टसच्या सदस्यपदी जिल्हा कबड्डी असोसिएशनचे सरचिटणीस प्रा. संभाजी पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राज्य शासनाने प्रा. पाटील यांची नियुक्ती करण्यासंदर्भात विद्यापीठास निर्देश दिले होते. त्यानुसार त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

कोल्हापूरच्या नव्हे तर महाराष्ट्राच्या कबड्डीतील दादा माणूस म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रा. पाटील यांच्या नियुक्तीने मातीच्या खेळाला सोन्याचे मोल मिळवून देणाऱ्या सच्चा संघटकाचा सन्मान झाल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे. गेली पस्तीस वर्षे कोल्हापूर जिल्ह्याच्या कबड्डीच्या विकासासाठी



झटत आलेल्या प्रा. संभाजी पाटील यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेच्या कोल्हापुरातील राजर्षी शाहू महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून निष्ठेने काम केले. शाहू महाविद्यालयाचा कबड्डी, कुस्तीतील संघ केवळ राज्य नव्हे तर राष्ट्रीय स्तरावर गाजला. त्यामागे प्रा. संभाजी पाटील यांचे प्रशिक्षण आणि प्रेरणा कारणीभूत ठरली. जिल्ह्यातील कबड्डीपटूंसाठी त्यांनी महालक्ष्मी, सह्याद्री हे संघ स्थापन केले. ताराराणी संघासह इतर संघांनाही त्यांचेच मार्गदर्शन लाभले. जिल्हा कबड्डीच्या विकासासाठी झटणाऱ्या प्रा. पाटील यांना राज्य शासनाने शिवछत्रपती पुरस्कारानेही गौरविले आहे. तसेच त्यांना अनेक पुरस्कारही प्राप्त झाले आहेत. सध्या ते जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या जबाबदारीबरोबर राज्य कबड्डी असोसिएशनचे उपाध्यक्ष म्हणूनही कार्यरत आहेत. कबड्डीपटूंसाठी प्रसंगी मैदानावर चॉकपीट मारतानाही मागे पुढे न पाहणारा सच्चा कार्यकर्ता, संघ जिंकण्यासाठी प्रसंगी कडक भुमिका घेणारा होणारा प्रशिक्षक प्रा. पाटील यांची संभाजीदादा अशीच ओळख आहे. त्यांच्या नियुक्तीने कबड्डीतील 'दादा' माणसाचा सन्मान झाल्याची प्रतिक्रिया व्यक्त होते आहे. जिल्हा कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष खासदार धनंजय महाडिक यांनी प्रा. संभाजी पाटील यांचे अभिनंदन केले आहे.